भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/१०/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/१०/२०१७ चे २०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन बहीण हीला आरोपीने प्रेम पत्र देवुन प्रेम संबध निर्माण करून व जवळीक साधण्याच्या प्रयत्न केल्याने, व लैंगिक छळवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४ (ड),(१)(१) भादवी. सहकलम १२ बा.लै. सं.अधी. २०१२ .अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**२) घरातील सोन्याचे व चांदीचे दागीन्यांची चोरी :–**

दिनांक २८/१०/२०१७ ते २९/१०/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे परीवारासह बाहेर गावी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे राहते घराचे समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी आलमारीतुन सोन्या, चांदीचे दागीने किंमती २०,५००/–रु. व शेजारील कुशन शहारे यांचे सुध्दा राहते घराचे समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन गोदरेज आलमारीतील सोन्या, चांदीचे दागीने किंमती ४२,०००/–रु. चांदीची चाळ २ जोड वजन २ तोडे, चांदीचा करतोडा २ नग वजन १२ ग्रॅम, चांदीचे जोडवे ६ नग वजन ३० ग्रॅम, चांदीचे सिक्के ६ नग वजन ५० ग्रॅम, २ ग्रॅम सोन्याचे मनी, सोन्याचा लॉकेट के असे लिहलिले वजन १ ग्रॅम, ७.५ ग्रॅम, साकन्याची अंगठी, ४ग्रॅम, डोरले, ३ ग्रॅम सोन्याचा तुकडा, १ ग्रॅम वजनाची अंगठी(मुंदी), सोन्याचे २ डोरले सोन्याची नथ वजन २.५ ग्रॅम, सोन्याचे कानातील टॉप्स ३ ग्रॅम, सोन्याचे मनी वजन २ ग्रॅम, असा एकुण ६२,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी प्रवीण मुरलीधर सुदरकर वय ३८ वर्ष, रा. गांधी वार्ड वडसा ह. मु. भिवाजी पेठ लाखांदुर यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) साई टाईल्स दुकानातील नगदी पैश्याची चोरी : –**

दिनांक २८/१०/२०१७ ते २९/१०/२०१७ चे २१.००वा. ते ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी रामकृष्ण शंकर गिन्हेपुंजे वय ४९ वर्ष, रा. केसलवाडा खात रोड न्यु फ्रेन्डस कॉलोनी भंडारा श्री साई टाईल्स बंद दुकानाचे रात्र दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने फायबर दरवाज्याचा हॅन्डड्राप तोडुन आत प्रवेश करुन दुकानातील काऊटर टेबलचा ड्राव्हरचा ताला तोडुन त्यामधील नगदी १०,०००/–रु चिल्लर ३००/–रु. असा एकुण १०,३००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गदादे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) जादुटोणा करण्याचे कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २९/१०/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरासमोर येवुन 'तु आमच्यावर जादुटोणा केल्यामुळे आम्ही बिमार झालोत' तु जादुटोणा करतोस म्हणुन तुझेच नाव निघते असे म्हणुन भांडण, शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी केशव टिकाराम फसाटे वय ६८ वर्ष, रा. सेलोटी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३(१)(ख),७ महा. जादु. टोना कायदा. अंधश्रध्दा २०१३ सहकलम ५०६,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत. .

**५) दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने सोबत शस्त्रे बाळगुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक २९/१०/२०१७ चे १०.३५ वा. दरम्यान यातील आरोपीतांनी गावटी कट्टा किंमती ५००/—रु व लोखंडी मुठ किंमती १०/—रु. असलेले चाकु अश्या प्रकारचे शस्त्र बाळगुन कोणत्यातरी गंभिर स्वरुपाचा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी म्हसकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३९९ भादवी. सहकलम ३,२५ भां.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. हावरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे. .

**६) हद्दपार असुन आदेशांचे उल्लघंन करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. : —**

दिनांक २९/१०/२०१७ चे १४.३५ वा. दरम्यान यातील आरोपी उपविभागीय दंडाधिकारी सा. तुमसर यांचे आदेश फौजदारी क्र. २/१७ कलम ५७ मपोका अन्वये तुमसर दिनांक १५/०७/२०१७ अन्वये २ वर्षा करीता भंडारा जिल्हयातुन हद्द्पार असुन आदेशाचे उल्लघंन करतांनी मिळुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २४२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) शेतातील धानाचा पुंजना जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . : —**

दिनाक २७+२८/१०/२०१७ चे. रात्र. दरम्यान यातील संशयीत आरोपीने फिर्यादीचे शेतात असलेला धानाचा पुंजना जाळुन ६०,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी शरद रामचंद्र जिभकाटे वय ५७ वर्ष, रा. विरली यांचे तोंडी रिपोर्ट व चौकशी वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४३५,४२७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**८) अवैध दारू अंडयावर धाडी . :—**

दिनांक २९/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, तुमसर, सिहोरा, साकोली, लाखनी, पवनी येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २३ लिटर हातभट्टी दारू किंमती १९००/—रु. व ६ लिटर ६६० मिली लिटर देशी दारू किंमती २,०१० /रु असा एकुण ३,९१०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता